**विशेष दरखास्त क्र.१/२०१६ मधील**
**निशाणी क्रमांक १ खालील आदेश**
**[ CNR No. MHWS050001562016 ]**

१) मयत धनको परती मोहना धोती यांचे वारस आत्माराम परती धोती यांनी न्यायालयात जमा असलेली रक्कम रु.१,१२,५२१/- मिळणेकरिता अर्ज निशाणी क्र. १० दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांच्या विधीज्ञांनी त्यावर दिलेले म्हणणे विचारात घेतले. धनको यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. एम.यु.राठोड यांचा, ऋणको क्र.१ व २ यांच्यातर्फे सहा. सरकारी वकील श्री. आर.एम. बेलोकार यांचा आणि गैरअर्जदार क्र. ३ यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. पी.डी. लहाने यांचा युक्तीवाद ऐकला.

३) धनको यांच्या विधीज्ञांनी असा युक्तिवाद केला की, मयत धनको परती मोहना धोती यांनी एल.ए.सी. क्र.२५/२०१५ (जुना एल.ए.सी. क्र. १८/२०१५) ही दाखल केली होती व ती दिनांक ९.२.२०१६ रोजी निकाली निघालेली आहे. त्या अनुषंगाने मयत धनको परती धोती यांनी प्रस्तुतची दरखास्त ही रक्कम रु. ८,९७,८४४/- च्या वसुलीसाठी दिनांक २८.६.२०१६ रोजी दाखल केली आहे. परंतू धनको परती मोहना धोती हे दिनांक १२.१०.२०१९ रोजी मयत झाले. तसेच अर्जदाराची आई ही सुध्दा दिनांक ४.१२.२०२० रोजी कोरोनामुळे मयत झाली. परंतू कोरोना काळात सगळीकडे बंद असल्यामुळे त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायतला केली नाही व ते त्यांच्या आईवडीलांना एकटेच वारस आहेत याबाबत त्यांचे प्रतिज्ञालेख निशाणी क्र. ११ दिलेला आहे व त्या अनुषंगाने अर्ज निशाणी क्र. ५ व ६ खालील दिनांक १७.२.२०२६ रोजीच्या आदेशानुसार वारस म्हणून आत्माराम परती धोती यांच्या नावाने अर्ज निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्त केली व दुरुस्त अर्जाची प्रतही दिनांक १७.२.२०२६ रोजी दाखल केली.

४) धनको यांच्या विधीज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, ऋणको यांनी धनको यांना देय असलेल्या रकमेपोटी रक्कम रु.१,१२,५२१/- चा धनादेश न्यायालयाचे सी.सी.डी. नं.३१/२०२५ अन्वये, दिनांक २८.४.२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

शासनाने कोणतेही अपील मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेले नाही व तसा स्थगनादेश नाही. भविष्यामध्ये तश्याप्रकारचे अपील झाल्यास व धनको यांचे विरुध्द निकाल लागल्यास धनको रक्कम रु.१,१२,५२१/– न्यायालयात जमा करण्यास तयार आहे आणि वारस धनको आत्माराम परती धोती यांनी निशाणी क्र. १२ अन्वये त्याबाबतचे त्यांचे बंधपत्र (indemnity bond) दिले आहे. सबब सदरची रक्कम मयत धनको यांचे वारस आत्माराम परती धोती यांना देण्यात यावी.

५) याउलट ऋणको क्र. १ व २ आणि ऋणको क्र. ३ यांचे विधीज्ञांनी यांनी असा युक्तीवाद केला की, योग्य ती पूर्तता केल्यानंतर रक्कम धनको यांना देण्यात यावी.

६) अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, मयत धनको परती मोहना धोती यांनी एल.ए.सी. क्र.२५/२०१५ (जुना एल.ए.सी. क्र. १८/२०१५) ही दाखल केली होती व ती दिनांक ९.२.२०१६ रोजी निकाली निघालेली आहे. त्या अनुषंगाने मयत धनको परती धोती यांनी प्रस्तुतची दरखास्त ही रक्कम रु. ८,९७,८४४/– च्या वसुलीसाठी दिनांक २८.६.२०१६ रोजी दाखल केली आहे. परंतू धनको परती मोहना धोती हे दिनांक १२.१०.२०१९ रोजी मयत झाले आणि अर्ज निशाणी क्र. ५ व ६ खालील दिनांक १७.२.२०२६ रोजीच्या आदेशानुसार वारस म्हणून आत्माराम परती धोती यांच्या नावाने अर्ज निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्त केली व दुरुस्त अर्जाची प्रतही दिनांक १७.२.२०२६ रोजी दाखल केली. तसेच तो अर्ज क्र.२५/२०१५ हा तत्कालीन न्यायिक अधिकारी यांनी दिनांक ९.२.२०१६ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार अंशतः मंजूर केला व त्या अनुषंगाने धनको यांनी प्रस्तुतची दरखास्त ही दिनांक २८.६.२०१६ रोजी रक्कम रुपये ८,९७,८४४/– च्या वसुलीकरिता दाखल केलेली आहे. तसेच, मयत धनको चे वारस यांनी त्यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये १,१२,५२१/– मिळण्यासाठी प्रस्तूतचा अर्ज निशाणी क्र. १० दाखल केलेला आहे.

७) प्रस्तूत अर्जाचे अनुषंगाने सहाय्यक अधिक्षक (वित्त व रोखे), दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर यांचा अहवाल मागविण्यात आला व त्यांनी दिनांक २६.२.२०२६ रोजी असा अहवाल दिला की, रक्कम रु. १,१२,५२१/– ही सी.सी.डी.क्र. ३१/२०२५ नुसार दि.२८.४.२०२५ रोजी जमा केली असून ती दिनांक ३०.१२.२०२५

रोजी मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात आली आहे.

८) मयत धनको यांचे वारस आत्माराम धोती यांनी निशाणी क्र. १२ अन्वये त्यांचे बंधपत्र (indemnity bond) १००/– रुपयाच्या स्टॅम्पवर दिले आहे. तसेच प्रस्तूतच्या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय यांचेकडे कोणतेही प्रकरण दाखल केलेले नाही.

९) उपरोक्त सर्व परिस्थिती, अर्जदार आत्माराम यांचे प्रतिज्ञालेख निशाणी क्र. ११, अर्जदार/धनको यांचे बंधपत्र निशाणी क्र.१२, सहाय्यक अधिक्षक (वित्त विभाग) यांचा उपरोक्त अहवाल आणि धनको यांचे विधीज्ञ यांचा उपरोक्त युक्तीवाद हे सर्व एकत्रीतरित्या विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे,

## आदेश

१] अर्ज निशाणी क्र. १० मंजूर करण्यात येत आहे.

२] सहाय्यक अधिक्षक (वित्त विभाग), दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर यांनी मयत धनको परती मोहना धोती यांचे वारस आत्माराम परती धोती, राहणार – पाळोदी(रंजीत नगर),ता. मानोरा जि. वाशिम, यांना पडताळणीअंती प्रस्तुत दरखास्तीमध्ये दि. २८.४.२०२५ रोजी सी.सी.डी.क्र. ३१/२०२५ अन्वये न्यायालयात जमा असलेली रक्कम रु. १,१२,५२१/– ही व्याजासह प्रदान करावी.

३] रक्कम प्रदान केल्याबाबतची नोंद संबंधीत रजिष्टरमध्ये घेण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.26 16:10:30 +0530

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, मंगरुळपीर.

स्थळ : मंगरुळपीर.
दिनांक : २६.२.२०२६

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D., Mangrulpir. |
| Date of Decision | : | 26.2.2026 |
| Order signed by the P.O. on | : | 26.2.2026 |
| Order uploaded on | : | 26.2.2026 |